महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९३ वा | दिनांक : २१/०५/२०२५ | वार : बुधवार

# राज्यात कोरोना रुग्णसंख्येत वाढ




**मुंबई :** राज्यात कोरोनाच्या संसर्गात सध्या स्थिरता असली तरी मुंबई आणि पुण्यातून समोर आलेल्या नव्या रुग्णांनी आरोग्य यंत्रणेला सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. सध्या मुंबई महापालिकेच्या हद्दीत ५६ कोरोनाबाधित रुग्ण आढळले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, तर पुण्यात नव्याने एका वृद्धाला कोरोनाची लागण झाल्याचे समोर आले आहे. यामुळे राज्यात एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ५७ वर पोहोचली आहे. यंदाच्या वर्षातील पुण्यातील हा पहिलाच रुग्ण असल्याने आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

पुण्यात ८७ वर्षीय एका वृद्ध पुरुषाला कोरोनाची लागण झाली असून तो सध्या शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत आहे. यंदाच्या वर्षात पुण्यात आढळलेला हा पहिलाच कोरोना रुग्ण असल्याने स्थानिक आरोग्य प्रशासन सतर्क झाले आहे. कोरोना रुग्णांची संख्या जरी कमी असली, तरी पुण्यात पुन्हा एकदा संसर्गाचा शिरकाव झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

यंदाच्या वर्षात आतापर्यंत राज्यात एकूण ८७ कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी ३१ रुग्ण पूर्णपणे बरे झाले असून उर्वरित ५६ रुग्ण घरीच आयसोलेशनमध्ये आहेत. महाराष्ट्रात सध्या ५७ रुग्ण सक्रिय असून, यापैकी केवळ एक रुग्ण पुण्यात असून उर्वरित सर्व रुग्ण राजधानी मुंबईत आहेत. मे महिन्यापासून रुग्ण संख्येत किंचित वाढ झाली असली, तरी ती एखाद्या एका भागापुरती मर्यादित न राहता शहरभर विखुरलेली असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

आरोग्य विभागाने सोमवारी एकूण ४६ कोरोना चाचण्या केल्या. त्यामध्ये १५ आरटीपीसीआर व ३१ रॅपिड अँटीजन चाचण्या समाविष्ट होत्या. २०२४ मध्ये एकूण चार लाख ८४ हजार ३५२ चाचण्या करण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये ५ हजार ५२८ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले होते. त्यापैकी ३५ रुग्णांचा मृत्यू झाला होता. सकारात्मक बाब म्हणजे २०२५ मध्ये आतापर्यंत कोरोनामुळे राज्यात एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही. ही बाब राज्यासाठी दिलासादायक मानली जात आहे.

दरम्यान, आशियातील सिंगापूर, हाँगकाँग, चीन आणि थायलंडमध्ये कोरोनाव्हायरसचे रुग्ण पुन्हा वाढत आहेत. या देशांमध्ये नवीन रुग्णांची संख्या वाढत आहे. १ मे ते १९ मे दरम्यान सिंगापूरमध्ये ३ हजार रुग्ण आढळले. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत ही संख्या ११ हजार १०० होती. येथे प्रकरणांमध्ये २८ टक्के वाढ झाली आहे.

जानेवारीपासून हाँगकाँगमध्ये 81 प्रकरणे नोंदवली गेली आहेत. यापैकी 30 जणांचा मृत्यू झाला आहे. चीन आणि थायलंडमध्येही अलर्ट जारी करण्यात आला आहे. तथापि, रुग्णांच्या संख्येबाबत येथे कोणतीही माहिती दिलेली नाही. 1 जानेवारी ते 19 मे पर्यंत भारतात 257 प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

यावेळी, ओमिक्रॉनचा नवीन व्हेरिएंट, JN१, आणि त्याचे उप-प्रकार LF७ आणि NB१.८, संसर्गासाठी जबाबदार असल्याचे मानले जाते. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, हा नवीन व्हेरिएंट अधिक धोकादायक आहे किंवा पूर्वीपेक्षा वेगाने पसरतो, याचा कोणताही पुरावा अद्याप मिळालेला नाही. तथापि, त्यांचा असा विश्वास आहे की, ही लाट कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या लोकांवर परिणाम करू शकते.

अभ्यासानुसार, JN१ ला निष्क्रिय करणे रोगप्रतिकारक शक्तीसाठी काहीसे कठीण आहे. मागील लस किंवा अँटीबॉडीज त्याविरुद्ध कमी प्रभावी आहेत, परंतु XBB.१.५ मोनोव्हॅलेंट बूस्टर लस JN१ शी लढण्यास मदत करते.

WHO च्या मते, XBB१.५ मोनोव्हॅलेंट बूस्टर ही एक COVID-१९ लस आहे. हे विशेषत: ओमिक्रॉनच्या XBB१.५ उप-प्रकाराची ओळख पटविण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे बूस्टर शरीरात अँटीबॉडीज वाढवते आणि JN१ मुळे होणाऱ्या आजारांना १९ टक्के ते ४९ टक्के पर्यंत रोखू शकते.

# छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ



**नाशिक :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा अखेर सरकारमध्ये प्रवेश झाला आहे. त्यांनी मंगळवारी सकाळी राजभवनात आयोजित एका छोटेखानी समारंभात कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसींचे बडे नेते असणाऱ्या भुजबळांचा मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. त्याचा पक्षाला मोठा लाभ होण्याची शक्यता आहे.

मंत्री झाल्यानंतर भुजबळ म्हणाले - 'असे म्हणतात की, ज्याचा शेवट चांगला, त्याचे सर्व चांगले.' आतापर्यंत मी प्रत्येक जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली आहे. आताही मला जी काही जबाबदारी मिळेल ती मी नेटाने पार पाडेन.

मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जे खातं देतील त्या खात्याचा मंत्री म्हणून काम करणार आहे. मी असे कोणते खातं मागितले नाही. मी सर्व खाते सांभाळले आहे, आता ज्या खात्याची जबाबदारी दिली जाईल ती स्वीकारू, असे भुजबळांनी म्हटले आहे.




# सरन्यायाधीशांचा अपमान संविधानाच्या प्रतिष्ठेवर आघात : नाना पटोलेंचे राष्ट्रपतींना पत्र



**मुंबई :** सरन्यायाधीश भूषण गवई हे मुंबई दौ-यावर असताना राज्य सरकार व प्रशासकीय यंत्रणेकडून राजशिष्टाचाराचा भंग करून त्यांचा अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून केली आहे.

या संदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, सरन्यायाधीश हे संविधानिक संस्थेचे प्रमुख आहेत, त्यांचा अवमान हा संपूर्ण न्यायव्यवस्थेचा अवमान आहे. हा केवळ एका व्यक्तीच्या दुर्लक्षित वागणुकीपुरता मर्यादित नाही, तर भारतीय संविधानाच्या प्रतिष्ठेवर झालेला थेट आघात म्हणून याकडे पाहावे लागेल. ते आंबेडकरी विचारसरणीचे असल्याने त्यांना अशी वागणूक दिली का? विशेष म्हणजे ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सरकारकडून त्यांना मिळालेली उपेक्षात्मक वागणूक ही सामाजिकदृष्ट्या संवेदनशील बाब आहे.

मा. सरन्यायाधीशांनी स्वतः आपल्या भाषणात राज्य सरकार व प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यांच्या विधानामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या प्रकाराकडे वळले असून, हा फक्त प्रोटोकॉलचा भंग नव्हे, तर एका विचारधारेचा व संवैधानिक मूल्यांचा अवमान आहे का? हा प्रश्न देखील उपस्थित होतो.

या पार्श्वभूमीवर नाना पटोले यांनी महामहीम राष्ट्रपतींना पाठवलेल्या पत्राद्वारे संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही आणि संविधानिक संस्थांचा सन्मान अबाधित राहील.

न्यायमूर्ती भूषण गवई यांनी नुकतेच देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून पद व गोपनीयतेची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर ते रविवारी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर आले होते. सरन्यायाधीशपदी निवड झाल्यानंतर ते पहिल्यांदाच मुंबईला आले होते. चैत्यभूमीवर जाण्यापूर्वी मुंबईत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. पण या सोहळ्याला राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक व मुंबईचे पोलिस आयुक्त या तिघांपैकी कुणाचीही उपस्थिती नव्हती.

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी या अनुपस्थितीची शेलक्या शब्दांत दखल घेतली. महाराष्ट्रातील एका व्यक्ती देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश म्हणून पहिल्यांदा राज्यात आला. त्यामुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहणे हे महाराष्ट्राच्या मुख्य सचिव, पोलिस महासंचालक व मुंबईच्या पोलिस आयुक्तांना योग्य वाटत नसेल तर त्यावर त्यांनी विचार केला पाहिजे, असे ते म्हणाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ मे २०२५


## १९ मे रोजीच्या धरणे आंदोलनात शेतकऱ्यांचाही कृषी सहायकांना पाठिंबा



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** कृषी सहाय्यकांनी दिनांक 5 मे पासून पुकारलेल्या आंदोलनात आज धरणे आंदोलनाचा टप्पा पार पडला. कृषि मंत्री यांनी आश्वासन न पाळल्याने छत्रपती संभाजीनगर जिल्हायचे कृषि सहाय्यक १५ मे पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे ही माहिती कृषी सहाय्यक जिल्हा अध्यक्ष रंगनाथ पिसाळ यांनी दिली.महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात आंदोलन पुकारले होते. त्या अनुषंगाने संघटनेस कृषि मंत्री यांनी दि. १०/०२/२०२५ रोजी बैठकीस बोलावून कृषि सहाय्यकांच्या मागण्यांची सोडवणूक १५ (पंधरा) दिवसांमध्ये पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु मंत्री यांनी आश्वासन पाळले नाही.

श्री जगन्नाथ तायडे ( कृषी भूषण) , अशोक पाटील हुड किसान शेतकरी संघटना अध्यक्ष यज्ञेश कादबाने पुरस्कार प्राप्त शेतकरीयांनी सर्वांनी आमचा आपल्या आंदोलनास पाठिंबा असल्याचे सांगून शासनास कृषी सहायकांच्या मागण्या त्वरित मंजूर करून शेतकऱ्यांची कामे थांबणार नाही याची दक्षता घ्यावी असे सांगितले.शेतकरी वर्गात लोकप्रिय अधिकारी म्हणून कृषी सहाय्यक यांची ओळख आहे.

भारत हा शेती प्रधान देश आहे .परंतु शेतकरी आणि कृषी विभाग यांना आंदोलन केले शिवाय काहीच मिळत नाही .हे मात्र तितकेच सत्य.

मागण्या पुढील प्रमाणे१) कृषि सेवक कालावधी रद्द करुन कृषि सेवकांना नियमित कृषि सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी.२) कृषि सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषि अधिकारी करणे.३) कृषि विभागामधील संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरुपात होत असतांनाही कृषि सहाय्यकांना Laptop (लॅपटॉप) दिला जात नाही.४) कृषि सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषि मदतनिस देणे बाबत. (ग्रामस्तरावर समकक्ष असणाऱ्या तलाठी व ग्रामसेवका प्रमाणे मदतनिस मिळावा.)५) निविष्ठा वाटपा संदर्भात वारंवार निवेदन देवून सुध्दा त्यामध्ये सुसुत्रता येत नसून, कृषि सहाय्यकांना वाहतुक भाड्यापोटी आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

तरी मार्गदर्शक सुचनेमध्ये विविध योजनेत कृषि सहाय्यक यांना वाहतुक भाड्याची तरतुद करावी किंवा निविष्ठा वाटप परमिटद्वारे करावे. अन्यथा खरीप हंगाम २०२५ मधील निविष्ठा वाटपावर संघटनेचा बहिष्कार असेल.६) कृषि विभागाचा आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावी व त्यामध्ये कृषि पर्यवेक्षक यांची पदे वाढवून कृषि सहाय्यकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावी व महसुल विभागाप्रमाणे आकृतीबंध करावा. कृषि सहाय्यक कृषि पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४ : १ या प्रमाणे करावे. ७) पोकरा POCRA योजनेमध्ये समुह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी.८) MREGS योजनेअंतर्गत लक्षांक देतांना क्षेत्रिय स्तरावरील अडचणीचा विचार करुन लक्षांक देण्यात यावे.९) नैसर्गिक आपत्तीच्या पंचनामे करणे व तद्नंतर करावयाच्या कामाबाबत महसुल, ग्रामविकास व कृषि विभागाच्या जबाबदाऱ्याबाबत योग्य न्यायसंगत कार्यपध्दती तयार करण्यात यावी. १०) सिल्लोड तालुक्यातील कृषि सहाय्यक यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रकारानंतर सदर प्रकरणाची विभागामार्फत चौकशी पूर्ण होवून सुध्दा संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. त्याबाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी. ११) कृषि सहाय्यक संवर्गाच्या आस्थापनाविषयक अडचणींची सोडवणूक करण्यात यावी. या प्रमाणे मागण्या केल्या आहेत.

वरील मागण्या पुर्ण न केल्याने आंदोलन पुढील संपाचा आज दिनांक 19 मे 2025 रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा टप्पा पार पडला. कृषी सहायकांच्या आंदोलनास कृषी पर्यवेक्षक संघटना, मंडळ कृषी अधिकारी संघटना, तालुका कृषी अधिकारी संघटना पाठिंब देऊन संपात उतरण्याची तयारी केली आहे.पुढील टप्पा 21 मे 2025 रोजी माननीय विभागीय कृषी सहसंचालक यांच्या कार्यालयावर धरणे आंदोलन राहणार आहे.आजच्या धरणे आंदोलनात उपस्थित - अध्यक्ष- रंगनाथ पिसाळ सचिव- किरण जावळे, प्रसिद्धी प्रमुख वैभव माने राज्य कार्यकारणी विठ्ठल गोराडे, उपाध्यक्ष जगदीश पवार, सोनल आगळे, जिल्हासंघटक- विजय सोनवणे, विठ्ठल चव्हाण, नारायण वैद्य, प्रवीण नाचण व संपूर्ण जिल्ह्यातील कृषी सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध वाळूची चोरटी वाहतूक करण्यासाठी समृद्धी महामार्गाचे सुरक्षा बॅरिकेट्स तोडले



### झोपेचे सोंग घेणाऱ्या प्रशासनाला जागे करता येईल का जनतेचा थेट सवाल...

**सिंदखेड राजा (महेश मुंढे) :** याबाबत सविस्तर वृत्त असे की समृद्धी महामार्गावर मृत्यू धावतोय काळजी घ्या, कारण सिंदखेड राजा व देऊळगाव राजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा भागातील चॅनल क्रमांक ३२३ व ३२७ वरून बॅरिकेट्स तोडून चोरटी वाळू वाहतूक ताशी १२० किलोमीटर वेगाने सुरू आहे आणि हे सर्व प्रशासनाच्या डोळ्यासमोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या समोर टोलनाकाच्या छत्रछाये खाली सुरू आहे तरी देखील प्रशासन झोपेतच आहे.

चोरटी वाळू वाहतूक करणारी वाहने ही बिनधास्त समृद्धी महामार्गावर चढतात, वाहनांवर नंबर नाहीत, कोणतीही सुरक्षा नाही, वाहनचालक परवानाधारक नाहीत.. झोपेचे सोंग घेणार प्रशासन हे निष्पाप लोकांचे बळी गेल्यावर जागे होईल का? हा प्रश्न जनता विचारते आहे. आयपीसी कलम ४२७,४४७ नुसार MSRDC कडून बॅरिकेट्स तोडल्यावर कारवाई होणे गरजेचे होते पण इथे MSRDC शांत दिसते, कदाचित वाळूमाफियांसोबत हात मिळवणे केली असेल का?

सगळ्यात मोठा कहर म्हणजे ही अवैध्य वाळू वाहतूक करणारी वाहने १२० किलोमीटर वेगाने सुसाट धावत आहे जर एखाद्या प्रवासी वाहनाला अपघात झाला तर किती मोठे संकट उभे राहील किती मृत्यू होतील याची कल्पना सुद्धा करवत नाही. चोरटी वाळू वाहतूक करणारी वाहने कोणाची आहेत? कोठून येत आहेत?वाहनांना नंबर नाहीत, हे सगळं सर्रासपणे सुरू असताना परिवहन विभाग कुठे दिसत नाही, की काही अधिकारी वाळूमाफी- यांना पाठीशी घालत आहेत काय? अशी चर्चा जनता करताना दिसून येत आहे.

सीसीटीव्ही फुटेज, स्थानिकांकडे व्हिडिओ, साक्षीदार सर्व पुरावे असूनही कारवाई मात्र होताना दिसत नाही, मग गुन्हेगार कोण प्रशासन की अवैध धंदे करणारे? असा थेट सवाल जनता विचारत आहे, समृद्धी महामार्गाचे ब्रॅकेट्स तोडणे गुन्हा नाही का? समृद्धी महामार्गावर या अवैध्य वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून अपघात झाल्यास जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने जनतेला द्यावी व ते योग्य ती कार्यवाही करून..


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..

अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २१ मे २०२५


# स्व. माधवराव (काका) पाटील यांची पुण्यतिथी मुरुम शहरात साजरी



स्व. माधवराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करताना बापूराव पाटील, शरण पाटील, रामकृष्णपंत खरोसेकर, व्यंकटराव जाधव गुरुजी, दिलीप भालेराव, दिलीप गरुड आदी.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** स्व. माधवराव उर्फ काका पाटील यांनी उमरगा-लोहारा तालुक्याच्या विकासासाठी स्वतःला जोखून देऊन मोठ्या मेहनतीने उभी केलेली साखर कारखानदारी, शिक्षणसंस्था या भागातील जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी जाणीवपूर्वक राबविलेल्या जलसिंचनाच्या लहान-मोठ्या पाणी योजना, बेनीतुरा मध्यम प्रकल्पाची उभारणी त्यातून झालेला कृषी, सहकार व औद्योगिक विकास. दरम्यान या परिसरात कुठलाही साखर कारखाना नसल्याने काकांनी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे हाल व खाजगी साखर कारखानदार यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी सहकारी तत्वावरील मुरूमच्या माळरानावर श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा झाला पाहिजे.

म्हणून साखर उद्योग उभारण्याचे ठरवून विकासाची पहिली मुहूर्तमेढ सन 1994 साली विठ्ठलसाईच्या रूपाने रोवली गेली. साखर कारखान्याच्या अगोदर काकांनी सन 1970 मध्ये नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम या शिक्षण संस्थेचा पाया रचला. पुढे त्यांचे जेष्ठ चिरंजीव माजी मंत्री बसवराज पाटील व त्यांचे बंधू जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी त्यावर कळस चढविला. तसेच युवा नेते जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील हे वडीलांचा व काकांचा आदर्श घेऊन पुढे त्यांच्या विचारसरणीनुसार कार्यतत्पर राहून वाटचाल करीत आहेत.

प्रारंभी स्व. माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले.

श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील स्व. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास मंगळवारी (ता.20) रोजी बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, विठ्ठल साई कारखान्याचे संचालक दिलीप भालेराव, माणिक राठोड, श्रमजीवी शिक्षण संस्थेचे संचालक रामकृष्णपंत खरोसेकर, मल्लिनाथ दंडगे, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, ॲड. संजय बिराजदार, ॲड. व्ही. एस. आळंगे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, रशीद शेख, धनराज पाटील, पप्पू सागर, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. राम सोलंकर, उल्हास घुरघरे, डॉ. शौकत पटेल, सलीम जमादार आदींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी व नूतन विद्यालय, मुरुम तसेच विठलसाई सहकारी साखर कारखाना आदी ठिकाणी कै. माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# राज्यात कोरोना वाढला तरी घाबरण्याचे काम नाही



**मुंबई :** राज्यात कोरोना वाढला तरी घाबरण्याचे काम नाही. राज्य सरकार पूर्णपणे अलर्ट मोडवर आहे. लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे. राज्यात वाढत्या कोरोना केसेसवर ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात कोरोनाच्या रुग्णसंख्येत हळूहळू वाढ होताना दिसत आहे. विशेषतः मुंबई महापालिका क्षेत्रात आतापर्यंत ५३ कोरोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. पुण्यातही एका रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळला आहे. यामुळे एकच खळबळ उडाली असून आरोग्य यंत्रण अलर्ट मोडवर आली आहे. त्यातच आता राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात कोरोना वाढतोय अशा बातम्या मी पाहतोय. परंतु, राज्यात कोरोना वाढला तरी घाबरण्याचे काम नाही. सगळ्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढलेली आहे, त्यामुळे घाबरुन जाऊ नका. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन प्रकाश आबिटकर यांनी जनतेला केले आहे. सध्या आरोग्य विभागाकडून मॅपिंग सुरु आहे. राज्य शासन सर्व आजारावर काम करण्यासाठी आणि उपचार करण्यासाठी सक्षम असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

केईएम रुग्णालयातील ज्या दोन रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तो कोरोनामुळे झालेला नाही. या दोन्ही रुग्णांना सहव्याधी (को-मॉर्बिडिटी) असल्याने त्यांचा मृत्यू झाला, असेही प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले. सरकार पूर्णपणे अलर्टवर आहे. लोकांनी घाबरु नये. केवळ को-मॉर्बिडिटी असलेल्या रुग्णांची काळजी घ्यावी लागते, असेही त्यांनी म्हटले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आदरणीय कुलगुरु प्रो. डॉ. संजीव सोनवणे सर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

दि. २१/०५/२०२५



## शुभेच्छुक

**प्राचार्य डॉ. हसन इनामदार**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र,
डॉ. दत्ताभाऊ पार्थीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)